लोकमत

# पोलीस दलातील परीक्षेत पात्र ठरूनही ११९ उमेदवारांची निवड प्रलंबित

२२लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : पोलीस दलांतर्गत मर्यादित उपनिरीक्षक परीक्षेत पाच वर्षांपूर्वी पात्र ठरूनही अद्याप ११९ उमेदवारांची निवड गृह खात्याच्या शिफारशीअभावी प्रलंबित राहिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या आधारावर खुल्या प्रवर्गातील या उमेदवारांची निवड करणे आवश्यक असतानाही अद्याप त्याबाबतचा प्रस्ताव मंत्रालयात प्रलंबित आहे.

राज्य लोकसेवा आयोगातर्फे खात्याअंतर्गत उपनिरीक्षक पदासाठी २०११ व २०१३ या परीक्षांतून पात्र ठरलेल्या ११९ उमेदवारांची ही व्यथा आहे. सामान्य प्रशासन व गृह विभाग यांच्यातील समन्वयाअभावी याबाबत धोरणात्मक निर्णय होत नसल्याचा संताप त्यांनी व्यक्त केला आहे. पीएसआयच्या मर्यादित परीक्षेतील १५४ मागासवर्गीय उमेदवारांबाबत घातलेल्या गोंधळामुळे गृह विभागाची नाचक्की झाली. आता खुल्या प्रवर्गातील उमेदवाराबाबत विभागाची उदासीनता चव्हाट्यावर आली आहे.

आयोगातर्फे २०११ व २०१३ मध्ये अनुक्रमे ७७५ व १६४ पदांची परीक्षा झाली. त्यासाठी जाहिरात दिलेली पदे भरली असली तरी दरम्यानच्या काळात २०१४ मध्ये उच्च न्यायालयात दाखल विजय घोगरे यांच्या याचिकेवर पदोन्नतीवरील आरक्षण हे घटनाबाह्य असल्याचा निकाल देण्यात आला. त्यामध्ये आरक्षणाच्या कोट्यातून दिलेल्या नियुक्ती अवैध ठरवित त्याच परीक्षेत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड गुणवत्तेनुसार करण्याचे आदेश देण्यात आले. त्याच्या कार्यवाहीसाठी राज्य सरकारला काही कालावधी दिल्यानंतर एका टप्प्यात काही उमेदवारांना परीक्षेत उत्तीर्ण ठरवून प्रशिक्षणासाठी पाठविले.

मात्र अद्याप त्यातील ११९ उमेदवार प्रलंबित असून त्यांच्याबाबत निर्णय घेण्यात गृह व सामान्य विभाग परस्परांकडे बोट दाखवित आहे. दरम्यान, २०१६ मध्ये झालेल्या मर्यादित परीक्षेतील उमेदवारांची निवड गुणवत्तेच्या आधारावर करण्याच्या सूचना केल्या. मात्र त्यापूर्वी परीक्षा दिलेल्या पोलिसांबाबतचा निर्णय प्रलंबित आहे.

आरक्षणातून पदोन्नतीला सर्वोच्च न्यायालयाने आक्षेप घेतला. त्याला राज्य सरकारने आव्हान दिल्याने त्याबाबतची याचिका प्रलंबित आहे. तोपर्यंत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना सेवा ज्येष्ठतेच्या आधारावर बढती द्यावी, असा निर्णय राज्य सरकारने दिला आहे. त्यानुसार अन्य सर्व विभागांत पदोन्नती दिली जात आहे. पोलिसांच्या बढतीबाबत मात्र त्याबाबत संथगती कायम असल्याने पोलीस वर्तुळातून संताप व्यक्त होत आहे.

Mumbai Main
Page No. 2 Dec 20, 2018
Powered by: erelego.com